महाराष्ट्र शासन
विभागीय आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,छत्रपती संभाजीनगर
दुरध्वनी क्रमांक कार्यालय :- ०२४०, २४८५३४५
०२४०, २४८७७४२
Email:- hfwtcabd@rediffmail.com
hfwtcabd@gmail.com
कार्यालय :- प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,
सिडको एन-५, छत्रपती संभाजीनगर - ४३१००१,
क्र.आवकुकप्रकेंछसं/भांडार/ वस्त्रधुलाई सेवा /दरपत्रके/ 7380/२४
दिनांक 27 SEP 2024

# जाहिरात

विषयः- बेडशीट, पिलोकव्हर,चादरी, ब्लॅकेट, टॉवेल, नॅपकीन, दरवाजे खिडक्याचे पडदे, टेबलक्लॉथ, इ.कपडे धुण्याकरिता दरपत्रके मागविणेबावत.

उपरोक्त विषयानुसार आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, एन५, सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे कार्यालय व वसतीगृहामध्ये वापरण्यात आलेले बेडशीट, पिलोकव्हर, चादरी, ब्लॅकेट, टॉवेल, नॅपकीन,दरवाजे खिडक्याचे पडदे, टेबलक्लॉथ, ॲपरन, वाहन सीट कव्हर इ. कपडे धुण्याकरिता लागणा-या खर्चाचे दरपत्रके मान्य झाल्यापासुन एक वर्षाकरिता मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशील | दरप्रती नग/सर्व करासहित |
|---|---|---|
| १ | सिंगल बेडशीट | |
| २ | पिलो कव्हर | |
| ३ | सोलापुरी चादर | |
| ४ | वुलन ब्लॅकेट | |
| ५ | टॉवेल | |
| ६ | नॅपकीन | |
| ७ | ॲपरॉन | |
| ८ | मच्छरदाणी | |
| ९ | टेबल क्लॉथ | |
| १० | दरवाजे पडदे | |
| ११ | खिउकी पडदा | |
| १२ | वाहन सीट कव्हर | |
| १३ | डबल बेडशीट | |

इच्छुक व्यवसायिकांनी वरील प्रमाणे बाबनिहाय सिलबंद लिफाफा दरपत्रके दि.२७/०९/२०२४ पासुन दि.०४/१०/२०२४ पर्यंत संध्याकाळी ०५:०० पर्यंत या कार्यालयास सादर करावेत.

**अटी व शर्ती**

१) संपुर्ण दरपत्रक अथवा त्याचा भाग कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवलेला आहे.

२) दि.२७/०९/ २०२४ ते दि.०४/१०/२०२४ या कालावधीत ठिक ५:०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत व्दि लिफाफा पध्दतीने दरपत्रके स्विकारण्यात येतील.

Scanned with OKEN Scanner

३) दरपत्रक सादर करण्याचा अंतिम दि.४/१०/ २०२४ पर्यंत संध्याकाळी ०५:०० पर्यंत राहील.

४) एका स्वतंत्र सिलबंद लिफाफयामध्ये स्वंय साक्षाकिंत केलेली निम्न लिखीत वैध प्रमाणपत्रे घालुन त्यावर प्रमाणपत्रे असे नमुद करावे व दुस-या सिलबंद लिफाफयामध्ये दर पत्रके घालुन त्यावर दरपत्रके असे नमुद करावे. दोन्ही लिफाफे एका मोठया लिफाफयामध्ये घालुन तो सिलबंद लिफाफा सादर करावा. टपालाने अथवा कुरियरने पाठविलेली दरपत्रके विलंबाने प्राप्त झाल्यास ती रद्द समजली जातील.

५) सेवा पुरवठादार/सेवा केंद्र संचालकाचे मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अन्वये व्यवसाय नोंदणीचे अद्ययावत प्रमाणपत्र अथवा उदयोग आधार नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे.

६) पॅनकार्ड प्रमाणपत्र सादर करावे.

७) इच्छुक पुरवठादार व सेवा केंद्र संचालकाने संस्थेच्या लेटरपॅडवर किंमत दरपत्रक सर्व करासहित सादर करावे.

८) वस्त्र धुलाई केलेले साहित्य पुरवठादाराने स्वखर्चाने प्रस्तुत कार्यालयास पुरवठा करावे.

९) वस्त्रधुलाई करिता देण्यात आलेले कपडे फाटलेले किंवा कमी असल्याचे आढळल्यास सेवा पुरवठादाराने त्याची भरपाई करुन दयावी लागेल.

१०) अस्वच्छ/खराब/वस्त्र धुलाईचे बील अदा करण्यात येणार नाही.

११) दर पत्रक सादर करण्याची मुदत संपल्यानंतर प्राचार्य, आरोग्य व कुटूंबकल्याण प्रशिक्षण केंद्र, सिडको एन ५ छत्रपती संभाजीनगर कार्यालयात निवड समिती समक्ष दरपत्रके उघडण्यात येतील व त्याबाबत आपणांस कळविले जाईल. सदर दिवशी आपण अथवा आपले प्रतिनीधी उपस्थित नसला तरीही दरपत्रके उघडण्यात येतील व निवड समितीने घेतलेला निर्णय अंतिम राहील.

१२) देयकाची अदायगी **NEFT/RTGS/PFMS/CMP** पध्दतीनेच करण्यात येणार असल्याने संस्थेच्या लेटरपॅडवर आपल्या बॅंक खात्याची माहिती सादर करावी.

१३) उपरोक्त प्रमाणे अ.क्र. १ ते १२ अटी व शर्ती मान्य असल्याचे संस्थेच्या लेटर पॅडवर हमी पत्र दयावे.

(डॉ.संतोष कडले)
प्राचार्य
आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,
छत्रपती संभाजीनगर

Scanned with OKEN Scanner

# हमीपत्र

मी/आम्ही/———————————————————————— पत्ता ——————— आज दि. / /२०२४ रोजी हमीपत्र लिहुन देतो की प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र छत्रपती संभाजीनगर यांच्या संस्थेतील वस्त्रधुलाईकरिता मागविलेल्या दरपत्रकामध्ये नमुद केलेल्या १ ते १३ अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असुन त्या मला/आम्हाला मान्य आहेत. तांत्रिक लिफाफयामधील प्रमाणपत्राचे शिथीलतेबाबतचे सर्व अधिकार दरपत्रके निवड समितीने राखुन ठेवलेले आहेत. सदर बाबीची जाणीव मला/आम्हाला आहे व ते मान्य आहे. १ ते १२ अटी व शर्तीचे पालन करण्याच्या अधिन राहुन मी आम्ही सदरील दरपत्रके सादर करिता आहोत.

स्थळः-

दिनांकः-

दरपत्रक धारकाची सही
व शिक्का

नावः-
पत्ताः-

**टीपः- सदरील हमीपत्र सादरकर्त्याने स्वाक्षरीत करुन तांत्रिक लिफाफा क्र.१ मध्ये बंद करुन सादर करणे बंधनकारक आहे.**

Scanned with OKEN Scanner